**ठळक बातम्या**

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी पहलगाम दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यांवर विरोधक आक्रमक, लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब /लॅडिंग विधेयक २०२५ ला राज्यसभेचीही मंजुरी

- राजकीय भांडणात ईडी स्वतःचा वापर का करु देतेय, असा सर्वोच्च न्यायालयाचा सवाल

- मुंबईत २००६ मध्ये झालेल्या उपनगरी रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता /या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा

- बांग्लादेशाच्या हवाई दलाचं प्रशिक्षणार्थी विमान कोसळून पायलटसह १९ जणांचा मृत्यू, १०० हून अधिक जण जखमी

**आणि**

- केरळचे माजी मुख्यमंत्री आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व्ही एस अच्युतानंदन यांचं निधन

**<><><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी चर्चा करावी या मागणीसाठी विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहात सरकारला घेरत घोषणाबाजी केली. त्यामुळे दोन्ही सभागृहाचं कामकाज तीनवेळा काही काळासाठी आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी तात्काळ चर्चा घ्यावी अशी मागणी विरोधी पक्ष दिवसाच्या सुरुवातीपासून करत होते. लोकसभेचं कामकाज काही

काळासाठी तहकूब झाल्यानंतर दुपारी बारा वाजता कामकाज सुरू झाल्यावर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यावर सरकार चर्चेसाठी तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही सरकार चर्चेसाठी तयार असल्याचं सांगितलं. मात्र सदस्यांनी घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं गेलं. त्यानंतर चार वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी सभागृहाचं कामकाज तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

देशाच्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी उपयोगी पडेल अशी चर्चा या अधिवेशनात होईल, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. पावसाळी अधिवेशन सुरू होण्याआधी संसद भवन परिसरात ते आज वार्ताहरांशी बोलत होते. हे अधिवेशन देशासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या सामूहिक यशाचा विजयोत्सव आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. या अधिवेशनात सर्व सभागृह एका सुरात बोलेल तेव्हा लष्कराचं मनोधैर्य वाढेल, नागरिकांना प्रेरणा मिळेल आणि संरक्षण संशोधन, नवोन्मेष आणि उत्पादन क्षेत्राला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारतीय अर्थव्यवस्था वेगानं वाढत असून तिसऱ्या क्रमांकाकडे झेप घेत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

- **- होल्ड - बाईट - पीएम** - -

अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांच्या खासदारांनी सहकार्य करावं, अशी विनंती प्रधानमंत्र्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

एका सशक्त लोकशाहीत द्वेषाला काही जागा नसून देशात कोणताही पक्ष देशहिताला विरोध करत नाही असं राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड राज्यसभेत

म्हणाले. राजकीय पक्षांच्या सदस्यांनी एकमेकांशी सौहार्द आणि आदराने वागावं, आणि अशोभनीय भाषेचा वापर टाळावा असं आवाहन त्यांनी केलं.

लॅडिंग विधेयक २०२५ आज राज्यसभेत मंजूर झालं. लोकसभेत हे विधेयक यावर्षी मार्च महिन्यात मंजूर झालं आहे. जलवाहतूक कागदपत्रांची कायदेशीर प्रक्रिया सुलभ करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. या कागदपत्रांमधे वाहून नेल्या जाणाऱ्या मालाचं प्रमाण, प्रकार, स्थिती आणि गंतव्यस्थान यांचा समावेश असतो.

**<><><><><><>**

राजकीय भांडणांसाठी ईडी स्वतःचा वापर का करु देते, असा प्रश्न विचारत सर्वोच्च न्यायालयानं, कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणारी ईडीची याचिका आज फेटाळली. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नीला एका प्रकरणात ईडीनं बजावलेलं समन्स कर्नाटक उच्च न्यायालयानं रद्द केलं होतं. याला आव्हान देणाऱ्या, ईडीच्या याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीशांनी महाराष्ट्रातल्या घटनांचं उदाहरण देत ही टिप्पणी केली.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी ईडीची याचिका फेटाळण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं स्वागत केलं आहे.

**<><><><><><>**

मुंबईत लोकल रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व १२ आरोपींना सबळ पुराव्याअभावी आज मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केलं.

या १२ पैकी पाच आरोपींना फाशीची शिक्षा, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळीवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा

सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरल्याचं न्यायाधीश अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या पीठानं यावेळी स्पष्ट केलं. या प्रकरणातल्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याचं निरीक्षणही न्यायालयानं नोंदवलं.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट....**

मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकल गाड्यांमध्ये सात साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या बॉम्बस्फोटांमध्ये १८९ जण मृत्युमुखी पडले, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले. तर अनेकजण आयुष्यभरासाठी जायबंदी झाले. या खटल्यात विशेष मकोका न्यायालयानं सप्टेंबर २०१५ मध्ये १२ जणांना दोषी ठरवलं होतं.

**<><><><><>**

बांग्लादेशाच्या हवाई दलाचं प्रशिक्षणार्थी विमान आज दुपारी एकच्या सुमारास माइलस्टोन कॉलेज परिसरात कोसळलं. या अपघातात विमानाच्या पायलटसह १९ जणांचा मृत्यू झाला असून १०० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

ढाका इथल्या उत्तरा भागातल्या माइलस्टोन कॉलेजच्या एका इमारतीवर हे लढाऊ विमान धडकलं. अपघातानंतर बांग्लादेशाच्या लष्करानं आणि अग्निशनम दलानं तातडीनं बचाव कार्य सुरू केलं. दरम्यान, या अपघातानंतर बांग्लादेश सरकारनं एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. अशा प्रसंगी भारत बांग्लादेशाबरोबर दृढतेनं उभा असून शक्य ती सर्व मदत द्यायला तयार आहे, असं मोदी यांनी समाजमाध्यमांत म्हटलं आहे.

**<><><><><>**

केरळचे माजी मुख्यमंत्री आणि  मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व्ही एस अच्युतानंदन यांचं आज वार्धक्यानं निधन झालं. ते १०१ वर्षांचे होते. गेल्या महिनाभरापासून त्यांना जीवरक्षक प्रणालीवर ठेवलं होतं.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीपासून अच्युतानंदन यांच्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात झाली. ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. केरळमधे कम्युनिस्ट पक्ष लोकांपर्यंत नेण्यात त्यांचं मोठं योगदान होतं. केरळच्या इतिहासात महत्त्वाचं स्थान असलेल्या १९४५-४६ च्या पुन्नप्रा-वायलर संघर्षाचं नेतृत्व व्ही एस अच्युतानंदन यांनी केलं होतं. त्यांनी दोन वेळा विरोधी पक्षनेते पद, तर २००६ ते २०११ या काळात मुख्यमंत्रीपद भूषवलं. त्यांच्या निधनाबद्दल मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरोनं  दुःख व्यक्त केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अच्युतानंदन यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनीही अच्युतानंदन यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><><>**

वादग्रस्त न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्यावर महाभियोग चालवण्यासाठी संसद सदस्यांनी आज लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याकडे निवेदन सादर केलं. या महाभियोग प्रस्तावावर १४५ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. भाजप, काँग्रेस, माकप, टीडीपी, जेडीयू आदी पक्षांच्या खासदारांचा यात समावेश आहे. न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी रोख रक्कम सापडल्याच्या प्रकरणाची संसद चौकशी करणार आहे.

**<><><><><><>**

सरकार विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलू देत नाही असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. संसद भवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. सभागृहात केवळ मंत्र्यांनाच बोलण्याची परवानगी आहे,

विरोधी पक्षाच्या सदस्यांना नाही असं ते म्हणाले. भाजप खासदार राजीव प्रताप रुडी यांनी राहुल गांधी यांचे आरोप फेटाळून लावले.

**<><><><><>**

विविध समाज माध्यमांवर बेकायदा सट्टेबाजी करणाऱ्या ॲपची जाहिरात केल्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं आज अभिनेता प्रकाश राज, राणा दुग्गुबाती, विजय देवरकोंडा यांच्यासह अनेकजणांना  चौकशीसाठी समन्स पाठवलं.

**<><><><><>**

यंदाच्या बुद्धिबळ विश्वचषकाचं यजमानपद भारताकडे सोपवण्यात आलं आहे.  ही विश्वचषक स्पर्धा ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान आयोजित केली जाणार आहे.

//<><><><><>//